# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (आस्थापना विभाग)

जाहिरात क्र./**१९९** /पी.आर दिनांक:-**१५/०७**/२०२६

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिकेच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे नियंत्रणा खाली कंत्राटी स्वरुपात पद भरण्याकरीता मनपाचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण विभागा अंतर्गत येणारे कामे करण्या करीता खालीलप्रमाणे अनुभव असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण विभाग अंतर्गत **"कंत्राटी सामाजीक कार्यकर्ता** " हे पद निव्वळ कंत्राटी तत्वावर तत्वावर प्रथमत: ११ महिन्याचे कालावधीकरिता एकमुस्त मानधान रु.१८,५०० /- (अठरा हजार पाचशे ) वर भरावयाचे आहे. इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि.**२२/०६**/ २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता, अति. आयुक्त (सामान्य/ शहर ), म.न.पा मुख्यालय सिव्हील लाईन्स, यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ.क्र | पदाचे नाव | एकुण पद | वयोमर्यादा | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | " कंत्राटी सामाजिक कार्यकर्ता " | ०१ | किमान वयोमर्यादा १८ ते कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष | अ) Bachelor of Social Work / Master of Social Work.<br>ब) शासकिय, निम शासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा या विभागात किमान ३ वर्ष अनुभव असलेला उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |

वरील पदाकरिता इच्छूक उमेदावारांनी दि. / /२०२६ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० पर्यंतच्या दरम्यान आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांच्या नावाची नोंद करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**अर्हता:-**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
२. सदर पदाची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पद्धतीने असेल.
३. या पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.
४. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दिलेल्या प्रत्रात भरून थेट सादर करावेत. इतर प्रपत्रात सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
५. शासन निर्णय दि. ९ फेब्रुवारी, २०१८ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने करार/कंत्राटी पद्धती निर्माण केलेल्या पदांवर नेमणूकीच्या अटी-शर्तीबाबत तसेच सदर नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित न करण्याबाबत नमुद असल्याने उक्त पदावरील नियुक्ती ही निवड कंत्राटी स्वरूपाची असून, पुढे नियमित करण्यात येणार नाही.
६. सदरील पद हे प्रकल्पाच्या कामापुरतेच असेल.
७. वयोमर्यादा विचारात घेतांना दि. / /२०२६ ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

८. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींचां मानधनापोटी होणारा खर्च झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण विभागाच्या व्यय पद क्र. A२ ७६०१३४०७०५ मधून राहील.

९. उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती स्वसांक्षाकित करुन जोडाव्यात.

१०. उमेदवारांनी अर्ज सादर करुन अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

११. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीशी राहील. व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल, तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र/हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.

१२. करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

१३. उमेदवारांनी निवड प्रक्रिये दरम्यान नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वरील सुचनांची नोंद घ्यावी. तसेच इतर कोणत्याही मार्गाने सुचना देण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१४. मुलाखती अंती प्राप्त गुणानुसार गुणवत्ता यादी व प्रतिक्षा यादी मनपाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येवून त्यानुसार आदेश निर्गमित करण्यात येईल.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता / अटी / शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

डॉ. बिपीन (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका, नागपूर

दिनांक :-     /     /२०२६

Scanned with OKEN Scanner

# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## कंत्राटी सामाजिक कार्यकर्ता

पदाकरिता सन २०२६-२७

## अर्जाचा नमूना

| पास पोर्ट साईज फोटो |
|---|

प्रति,

मा. आयुक्त/प्रशासक

महानगरपालिका, नागपूर

विषय :- कंत्राटी सामाजीक कार्यकर्ता या पदासाठी अर्ज.

संदर्भ :- दैनिक ..................................वृत्तपत्रात प्रकाशित झालेली जाहिरात.

उपरोक्त जाहिरातीचे संबंधाने मी, खालील अर्जदार **कंत्राटी सामाजीक कार्यकर्ता** या पदासाठी अर्ज करीत आहे व माझी आवश्यक माहिती खालील प्रमाणे आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | उमेदवाराचे पुर्ण नांव | नांव | वडीलाचे नांव | आडनाव |
| | (मराठीमध्ये) | | | |
| | (इग्रंजीमध्ये) | | | |
| २. | पत्रव्यवहाराचा सध्याचा संपुर्ण पत्ता, दुरध्वनी/भ्रमणध्वणी क्रमांक व ई-मेल आय.डी. | ......................................................................<br>......................................................................<br>पिन कोड क्रमांक ..............................<br>ई-मेल आय.डी. ..............................<br>व्हाट्स ॲप भ्रमणध्वनी क्र. .............................. | | |

| | | D | D | M | M | Y | Y | Y | Y |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | जन्म तारीख (अंकात) | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| ४. | जन्म तारीख (अक्षरात) :- | ...................................................................... |

| | | Y | Y | Y | Y | M | M | D | D |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | दिनांक / /२०२३ रोजी वय | | | | | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | जन्म ठिकाण | गाव | तालुका | जिल्हा |
| | | | | |
| | अ) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात काय ? (डोमेसाईल/नॅशनॅलिटी प्रमाणपत्र जोडावे) | होय/नाही | | |
| | ब) उमेदवार पुरुष आहे की स्त्री | पुरुष/स्त्री | | |

| | शिक्षण | तत्सम शैक्षणिक अर्हता (नमुद करणे) | विद्यापिठाचे नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | एकुण गुण (अ) | प्राप्त गुण (ब) | टक्केवारी (अ/ब) X १०० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | **शैक्षणिक पात्रता :-**<br>अ) सामाजीक कार्यकर्ता (Bachelor of Social Work) पदवी<br>ब) सामाजीक कार्यकर्ता (Master of Social Work) पदव्युत्त पदवी<br>**(नमुद करावे)** | | | पदव्युत्तर पदवी ची एकुण टक्केवारी (नमुद करणे) | | | |
| | **अनुभव :-** असल्यास नमुद करणे. | | | | किती वर्षाचा अनुभव (अंकात नमुद करणे) | | |
| | संगणक प्रमाणपत्र (एम.एस.सी.आय.टी.) वा तत्सम | | | | | | |
| | इतर अनुभव | | | | | | |

टिप:- १) अर्जासोबत शैक्षणीक पात्रता व अर्हतेचे प्रमाणपत्र तसेच तत्सम प्रमाणपत्र/फोटो/स्वाक्षरी इत्यादी टाचन करणे.

२) एक पासपोर्ट साईज फोटो अर्जासोबत चिटकवुन एक फोटो उजव्या बाजूस टाचन करणे.

(उमेदवाराची स्वाक्षरी)

Scanned with OKEN Scanner

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ**

**(नियम ४ पहा)**

**प्रतिज्ञापत्र**

अ) मी श्री. / श्रीमती / कुमारी...........................................................................................................
श्री ...........................................................................यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय.............
वर्ष राहणार .......................................................................................... याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१) मी ....................................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ............... (संख्या) इतकी हयात मुले आहेत त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यांनतर जन्माला आलेल्या मुंलाची संख्या ........ आहे (असल्यास जन्म दिनांक ..........................नमुद करावे)

३) हयात असलेल्या मुंलाची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक ०२ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलां मुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जानीव आहे.
(अविवाहीत उमेदवारानी नमुना -अ प्रतिज्ञापत्र लागु नाही असे नमुद करून स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. स्वाक्षरी नसल्यास अर्ज अपुर्ण आहे असे समजुन रद्द ठरविण्यात येईल)

ब) तसेच आपले कार्यालया करीता **कंत्राटी सामाजीक कार्यकर्ता** चे पद भरणे संबधी थेट मुलाखतीच्या अटी मी काळजी पूर्वक वाचल्या असून **कंत्राटी सामाजीक कार्यकर्ता** पदाचे कार्य मी प्रामाणिक पणे पार पाडेल.

सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून त्याचे पृष्ठयर्थ मी प्रमाणपत्राच्या सांक्षाकित सत्यप्रती जाहिरातीतील दिलेल्या क्रमानुसार अर्जासह सोबत जोडल्या आहे, व नमुद केलेली माहिती चुकीची व खोटी आढळून आल्यास माझी या पदाकरिता उमेदवारी रद्द होईल. व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहिल याची मला जाणिव आहे. या बाबत नियुक्ती अधिका-यांचा निर्णय मला बंधन कारक राहिल व या बाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ:-
दिनांक:- (उमेदवाराची स्वाक्षरी)

Scanned with OKEN Scanner